# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७९/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांक:- ०५ /०९/२०१८

## " भंडारा येथे अवैध दारूचा पुरवठा करणारे वाहनासह दारूसाठा पकडला"

**पोलीस अधिक्षक यांचे जिल्हा रेड पथकाची कार्यवाही**

भंडारा :–येथिल अवैध चिल्लर दारु विक्रत्यांना दारुसाठा पोहचविण्याकरीता आरोपी नामे सुनिल ज्ञानेश्वर हजारे, वय २६ वर्ष रा. करचखेडा हा आपले मोपेड स्कुटी क्र. एम. एच. ३६ अेसी ९२७६ गाडीनी कारधा मार्गे भंडारा येथे येत असल्याचे प्राप्त गोपनिय माहिती वरुन मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोउपनि जितेंद्र आडोळे यांचे सहकारी कर्मचारी यांनी वाहन व अवैध दारुसाठा किंमती ६४,००० रुपयाचा माल पकडुन कार्यवाही केली.

दिनांक ०४ सप्टेंबर २०१८ रोजी करचखेडा येथिल सुनिल ज्ञानेश्वर हजारे हा मोहफुलाची हात भट्टी दारुने भरलेले रबरी टयुब आपले मोपेड स्कुटी क्र. एम. एच. ३६ अेसी ९२७६ मध्ये भरुन करचखेडा, येथुन कारधा मार्गे भंडारा येथे येत असता दारु विक्री करणारा इसम २२.०० वा. सुमारास पोहचवुन देणार असल्याची गुप्त बातमी मिळाली. जिल्हा रेड पथकातील पोउपनि. जितेंन्द्र आडोळे यांनी आपले सहकारी कर्मचारी यांचेसह कारधा ते भंडारा येथे नाकाबंदी करीत असता कारधा कडुन सामान्य रुग्नालय भंडारा कडे येथे नगर परिषद वॉटर सप्लॉय जवळ सदरचे वाहन क्र. एम. एच. ३६ अेसी ९२७६ येत असतांना पाहुन त्यास थांबवुन अवैध दारुबाबत वाहनाची पाहनी केली असता सदर वाहनाचे पायदान जवळ दोन रबरी टयुब मध्ये अंदाजे ४० लिटर मोहाफुलाची हात भट्टी दारु किंमती ४००० रुपयाची मिळुन आली.तसेच एक पांढऱ्या काळया रंगाची स्कुटी क्र. एम. एच. ३६ अेसी ९२७६ वापरती होंडा कंपनीची अंदाजे किंमती ६०,००० रुपये असा एकुण ६४,०००रुपयाचा माल वाहतुक करतांना मिळुन आल्याने पंचा समक्ष कारवाई करुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे भंडारा येथे कलम ६५ (अ) महा. दारुबंदी कायदया अन्वये कार्यवाही करुन अटक करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक जितेंद्र आडोळे, सहा. फौजदार अश्विनकुमार मेहर, पोलीस हवालदार रुपचंद जांगळे, विनोद शिवनकर, यांनी केली आहे.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.